-२७-

**महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम**

**तंट्यांची माहिती संकलनास मुदतवाढ**

महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ सप्टेंबर २००७

शासन निर्णय, क्रमांक तंमुगा. १००९/सीआर ३७/पोल १५,

**वाचा.**— गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमआयएस. १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै २००७

## शासन निर्णय

संदर्भित दिनांक १९ जुलै २००७ च्या शासन निर्णयान्वये " महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम " दिनांक १५ ऑगस्ट २००७ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ७.२ (१) नुसार तंटामुक्त गाव समितीने गावामधील दाखल असलेल्या दिवाणी, महसुली, फौजदारी व इतर तंट्यांची माहिती ३० सप्टेंबरपर्यंत संकलित करावयाची आहे. तथापि, तंटामुक्त गाव समित्या व प्रशासकीय अधिकाऱ्यांना गणेशोत्सवामुळे तथा राज्यातील सुरू असलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमुळे ही माहिती संकलित करण्यास पुरेसा अवधी मिळालेला नाही. त्यामुळे सदर माहिती संकलनाची दिनांक ३० सप्टेंबर २००७ ची मर्यादा यावर्षासाठी वाढविण्यात येत असून ती दिनांक १५ ऑक्टोबर २००७ पर्यंत करण्यात येत आहे.

२. उक्त दिनांक १९ जुलै २००७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ७.२(२)(ब) येथील तरतुदींच्या अनुषंगाने पोलीस ठाण्यामधील कोणत्या कालावधीपासून प्रलंबित अदखलपात्र गुन्ह्यांची माहिती संबंधित गावातील तंटामुक्त गाव समित्यांना देण्यात यावी, याबाबत प्रशासकीय यंत्रणांकडून विचारणा होत असल्याने याबाबत शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी २००६ पासूनची अदखलपात्र (N.C.) फौजदारी गुन्ह्यांची माहिती समितीस पोलीस यंत्रणेकडून देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**म. आ. गुट्टे,**

शासनाचे अवर सचिव.